मौ २०८

म. ग्रं. सं. ठाणें

| विषय | सन |
| --- | --- |
| का।०२१ | १८८८ |

लेखक अ. वा. बरवे

पुस्तकाचें नांव स्मरणी

संग्रहालय क्रमांक ५६५

७६६

२०९

का

विषय
सं. नं.

म. ग्रं. सं. ठाणें

वा०५ ४८८



# ईश्वर प्रार्थना.

—१—

आधीं वंदूं सकल कर्ता। समस्त देवांचा
जो भर्ता। त्याचे भजनीं प्रवर्ता। कोणी तरी ॥१॥
तेणें वीण कार्य न चाले। पडिलें पर्ण तें हीं
न हाले। अवघें त्रैलोक्य चि चाले। जयाचे
नी ॥२॥ तो अंतरात्मा सकळांचा। देव दानव
मानवांचा। चार खाणी चार वाणींचा। प्रवर्तक
॥३॥ तो एकलाचि सकलां घटीं। करी भिन्न
भिन्न राहटी। सकल सृष्टीची गोष्टी। किती
म्हणोनी सांगावी ॥४॥ ऐसा जो गुप्तेश्वर ।

त्यास म्हणावें ईश्वर । सकल ऐश्वर्य थोर थोर त्याचे ति भोगिती ॥५॥

(नासिकेतापाख्यान)

## नमननिरूपण

—२—

जेथें दिसती विशेषगुण । तें सद्गुरुचें अधिष्ठान । या कारणें त्यासीं नमन । अत्यादरें करावें ॥१॥ नमस्कारें लीनता घडे । नमस्कारें विकल्प मोडे । नमस्कारें सख्य जडे । नाना सत्पात्रीं ॥२॥ नमस्कारें दोष जाती । नमस्कारें अन्याय क्षमिती । नमस्कारें मोडलीं जडतीं । समाधानें ॥३॥ नमस्कारें कृपाउचंबळे । नमस्कारें कृपा प्रबळे । नमस्कारें गुरु देव वोळे । साधका वरी ॥४॥ विशेष करितां नमस्कार । नासतींदोषांचे गिरिवर । आणि मुख्य परमे

श्वर । कृपा करी ॥५॥ नमस्कारें पतीत पावन। नमस्कारें संतासीं शरण । नमस्कारें जन्ममरण। दुरीं दुरावें ॥६॥ परम अन्याय करूनी आला। आणि साष्टांग नमस्कार घातला । तरी तो। अन्याय क्षमा केला । पाहिजे श्रेष्टीं ॥७॥ या कारणें नमस्कारा परतें । आणीक नाहीं अनु सरतें । नमस्कारें प्राणियांतें । सुबुध्दि लागे ॥८॥ नमस्करासि वेंचावें नलगे । नमस्कारासिं कष्टावें नलगे । नमस्कारासिं कांहीं नलगे । उपकरण सामुग्री ॥९॥ या कारणें नमस्कार श्रेष्ट । नमस्कारें वोळती श्रेष्ठ । येथें सांगितला स्पष्ठ । सहावी भक्ति ॥१०॥

(दासबोध)

## सद्गुरु

–३–

जे संसाराशीं वेगळे । ज्ञानवैराग्यें आगळे।

ब्रम्ह १८ स्वादा आनंदले । ते सद्गुरु ज्ञागान
॥१॥ काम क्रोधाचे नि विटाळे । जयाचें ची
त नं मळे । त्यां निरंतर सोहळे । ब्रम्हसुखाचे
॥२॥ विषय सुखाचे डोहोळे । मनीं नुपजती
कवंणे वेळे । जयाचें चित्त नुचंबळें । हर्ष विषा
दीं ॥३॥ ब्रम्हादिपिपीलिकांतीं । सकल भूत
जाती । जयाची चित्तवृत्ति । नधरी विषम भा
वातें ॥४॥ अपपरू हें कडसणी । आणीक ना
हीं खोडीकवणी । प्रपंचाचिया विनवणी । नांदे
परमार्थूची ॥५॥ जे ब्रम्हानंदें डुल्लती । कल्प
कांहींच न करती । जे दुराग्रही न होती । कव
णे विषयीं ॥६॥ करीती सत्कर्मे कोडें । परी स्व
स्वरूपास्थित्ति न मोडे । जया स्वानंद ओसंडे ।
सर्व इंद्रियद्वारें ॥७॥ त्याजित असतां नाहीं त्य
गु । भोगीत असतां नाहीं भोगू । नवल हा
ज्ञानयोगू । जेथें नांदतसे ॥८॥ निपजती इंद्रिया

 कात्री
२-०९

चे व्यापारू । परी अकर्तृत्वीं चतुरु । ब्रम्हविद्या देतां उदारु । जे अति पाडाचे ॥९॥ निमिषोन्मिषाचा व्यापारु । ज्यासी करितां शीणथोरु । ते योगींद्र जाणावें सद्गुरु । कैवल्यदानी ॥१०॥ इहींलक्षणीं आलंकृत जे देखिजेति महंत । तेचिसद्गुरु जाणावे निश्चित । ईश्वरी अवतार ॥११॥ ( विवेकसिंधु )

* * *

तरी गुरुचीं लक्षणें । शिष्यें आधीं अवलोकणें । अहंकृतित्यागिलिजेणें । जैसें मुणें शुचिष्मत्त ॥१॥ आचाराचें मूळपीठ । वेदांची उतारपेठ । उपासना एकनिष्ठ । ज्ञानचोखट अपरोक्ष ॥२॥ भूतीं अभेदभक्ति । वैराग्याचीउन्नति । वस्तीस आलीशांति । नैराश्यमूर्ति वोतिली ॥३॥ सर्वांभूतीं दयापर । शिष्याहितींसादर । बोधें संशयदूर । करिती॥विद्याविशारद ॥४॥ निर्विषय

ज्याचें मन । त्याजिलें मोहममतामान । कामक्रोध दोघेजण । केलें दीन जयांहीं ॥५॥ ऐसियां संत प्रति । शरण जावें अति प्रीति । जाणेनिं ईश्वर मुर्ति । मानवाकृति नटली हे ॥६॥ अंतर्बाह्य सोज्वळ । जैसें कारविमंडळ । तयांचें पदयुगुळ । शिष्यें निर्मळमनें पुजावें ॥७॥

( गणेशगीता )

## मृत्यु

—४—

संसार म्हणजे सर्वेचि स्वार । नाहीं मरणासी उधार । मापीं लागलें शरीर । घडीनें घडी ॥१॥ नित्य काळाची संगती । नकळे होणार चीगती । कर्मासारखे प्राणी पडती । नाना देशीं विदेशीं ॥२॥ सरतां संचिताचे विशेष । नाहीं क्षणाचा अवकाश । भरतां भरतां निमे

ष । जाणें लागे ॥३॥ होतां मृत्युची आटा
आटीं । कोणी घालुं न शकती पाठीं । सर्व
त्रांस कुटाकुटी । मागें पुढें होतसे ॥४॥ मृत्युन
म्हणे कार्या कारण । मृत्युन म्हणे वर्णावर्ण ।
मृत्युन म्हणे हा ब्राम्हण । कर्म निष्ठ ॥५॥ मृत्यु
न म्हणे ब्रम्ह हत्या । मृत्यु न म्हणे गोहत्या
मृत्यु न म्हणे नाना हत्या । स्त्री बाळकादि
॥६॥ मृत्यु न म्हणे हा स्वाधीन । मृत्युन म्हणे
हा पराधीन । सकळ जीवांसी प्राशन मृत्युच
करी ॥७॥ एक मृत्यु मार्गी लागले । एकीं
अर्ध पंथ क्रमिले । एक ते शेवटास गेले । वृ
द्ध पणीं ॥८॥ मृत्यु न म्हणे हा स्वदेशी । मृ
त्यु न म्हणे हा विदेशी । मृत्यु न म्हणे हा
उपवाशी । निरंतर ॥९॥ गेले बहुत वैभवाचे ।
गेले बहुत आयुष्याचे । गेले अगाध महि
मेचे । मृत्यु पंथे ॥१०॥ चारी खाणी चारीवाणी

चौऱ्याशीं लक्ष जीव योनी । जन्मा आले ति तुके प्राणी । मृत्यु पावती ॥११॥ मृत्यु भेणें पळोनि जातां । तरी मृत्यु सोडीना तत्वता मृत्युस नये चुकवितां कांहीं केल्या ॥१२॥ आतां असो हें बोलणें । मृत्यु पासूनी सुटिजे कवणें । मार्गे पुढें विश्वास जाणें । मृत्युपंथे ॥१३॥ ऐसें जाणोनियां जीवें । याचें सार्थक चि करावें । जनीं मरोनियां उरावें । कीर्तिरूप ॥१४॥

( दास बोध )

## प्रपंचांत परमार्थ

—५—

आधीं प्रपंच करावा नेटका । मग घ्यावें परमार्थ विवेका । येथें आळस करूं नका । विवेकी हो ॥१॥प्रपंच सांडून परमार्थ कराल । तेणें तुम्ही कष्टी व्हाल । प्रपंचपरमार्थ चालवा

परी तुम्हीं विवेकी ॥ २ ॥ प्रपंच सोडून परमार्थ केला । तरी अन्न मिळेना खायाला । मग तयां करंट्याला । परमार्थ कैंचा ॥ ३ ॥ प्रपंचीं जो सावधान । तो परमार्थ करील जाण । प्रपंचीं जो अप्रमाण । तो परमार्थी खोटा ॥ ४ ॥ म्हणून सावधान पणें । प्रपंच परमार्थ चालविणें । ऐसें न करितां भोगणें । नाना दु:ख ॥ ५ ॥ प्रपंचीं असोनि परमार्थ पाहे ॥ तो ह स्थितीतें लाहे । प्रारब्ध योगें करून राहे । लोकांमध्ये ॥ ६ ॥ पदार्थी असावे उदास । विवेक पाहावा सावकाश । येणें करितां जगदीश । अलभ्य लाभे ॥ ७ ॥ जगदीशा परता लाभ नाहीं ॥ कार्याकारण सर्व कांहीं । संसार करीत असतांही । समाधान ॥ ८ ॥ हा भरला संसाराचा । नफा पहावा देवाचा । तरीच या कष्टाचा । परिहार होतो ॥ ९ ॥ ( दास बोध )

# संसारीं कसें वागावें

— ६ —

साधनता असावी । नीतिमर्यादा राखावी । जनांस मानें ऐसी करावी । क्रियाशुध्द ॥ १ ॥ आलियाचें समाधान । हरिकथानिरूपण । सर्वदां प्रसंग पाहोन । वर्तत जावें ॥ २ ॥ शरीर परोप. कारीं लावावें बहुतांच्या कार्यास यावें । उणें. पडो न द्यावें । कोणी एकाचें ॥ ३ ॥ आडलें गांजलें जाणावें । यथाशक्ति कामास यावें । मृदु वचन बोलत जावें । कोणी एकासीं ॥ ४ ॥ दुसऱ्याचे दुःखें दुःखी व्हावें । पर संतोषें सुखी व्हावें । प्राणिमात्रास मिळवून घ्यावें । बऱ्या शब्दें ॥ ५ ॥ दुसऱ्याचें अंतर जाणावें । तदनुसाराचें वर्तावें । लोकांस परीक्षीत जावें । नानाप्रकारीं ॥ ६ ॥ नेमकेंचि बोलावें । तत्काळ

सं. क्र. ७०५
२८८



ठाणे.

चि प्रतिवचन द्यावे । कदापि सत्यास न यावे । क्षमारूपें ॥ ७ ॥ आळस अवघाच दवडावा । यत्न उदंडचि करावा । शब्द मत्सर न करावा । कोणी एकाचा ॥ ८ ॥ उत्तम पदार्थ दुसऱ्यास द्यावा । शब्द निवडून बोलावा । सावधपणें करीत जावा । संसार आपुला ॥ ९ ॥ मरणाचें स्मरण असावें । हरिभक्तीसी सादर व्हावें । मरोनि कीर्तीस उरवावें । येणेंप्रकारें ॥ १० ॥ स्वयें आपण कष्टावें । बहुतांचें सोशीत जावें । झिजोनि कीर्तीस उरवावें । नानाप्रकारें ॥ ११ ॥ पेरिलें उगवतें । बोलण्यासारखें उत्तर येतें । तरीमग कर्कश बोलावें तें । कायनिमित्त ॥ १२ ॥ आपल्या पुरुषार्थ वैभवें । बहुतांस सुखी करावें । परंतु कष्टी करावें । हे राक्षसी क्रिया ॥ १३ ॥

( दासबोध )

## द्रव्य

— ७ —

द्रव्या पाशीं अति अनर्थ, द्रव्या पाशीं प्राण घात । द्रव्य मिळतांचि विरक्त तरी विषया सक्त तो होय ॥ १ ॥ द्रव्य आशा धरली तरी, सखे बंधु होती वैरी । द्रव्यें मित्र होतसे दूरी, विकल्प अंतरीं शिरतसे ॥ २ ॥ द्रव्या पाशीं होत से कुबुध्दी द्रव्यें भ्रंशे साधकाची बुध्दी । द्रव्यासी चोर जपती आधी, प्राणांत संधी ते करिती ॥ ३ ॥ द्रव्यासी परचक्राचें भय, द्रव्यवानासि राजा नागविताहे । द्रव्यवान संसारिक आहे तरी दरवडा ये तयावरी ॥ ४ ॥ द्रव्य आशा धरितां मन, तरी विरक्तांसी निंदिती जन । द्रव्य प्रतिग्रह घेतांचि जाण, तरी पदरींचें पुण्य जाय।

ना

चंद्रिमास, तो हानीच होय

पूज्यस्थानीं आनमान विशेष, तरी कृत ग्रंथातले
जाणिजे ॥ ५ ॥ आपली स्त्री । हाचच्या संग्रहीं
भोगू पाहे आपण । देहीं पांडिराचें सर्वांच्या
तरी देव क्षोभ जाणिजे ॥ ६ ॥ श स्मरणी' तया
बहु असे । बोलूं जातां मताभ पैकीं हा
सक्त तो होसो । तरी देवक्षोभ जा प्य उप
सखे बंधु होती वैरी दृव्यसर्ताच ॥.)
विकल्प अंतरीं शिरतसे ॥२॥ पूरे ।
से कुबुध्दी दृव्यें मंशें साधकाचीबु
सी चोर जपती आधी, प्राणांत सधी ते का ना
॥ ३ ॥ दृव्यासी परचक्राचें भय, दृव्यवानास
राजा नागवितांहे । दृव्यवान संसारिक आहे
तरी दरवडा ये तयावरी ॥ ४ ॥ दृव्य आशा
धरितां मन, तरी विरक्तांसी, निंदितीजन । दृव्य
प्रतिग्रह घेतांचि जाण, तरी पदरींचे पुण्य दे